# मुंबई विद्यापीठ

**परिपत्रक** :– क्र. टीएएस(युटी/सीटी)/ १७ /२०१९–२०२०

संदर्भः– टीएएस/विशी/आयसीडी/१८–१९/१५१७ दिनांक २६/०२/२०१९

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानीत व विनाअनुदानीत महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव, मुंबई विद्यापीठातील विविध विभागांचे विभागप्रमुख, सर जे.जे. वास्तुशास्त्र महाविद्यालय, संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था, समन्वयक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अंबाडवे, समन्वयक, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, समन्वयक रत्नागिरी उपकेंद्र, समन्वयक ठाणे उपकेंद्र यांना कळविण्यात येते की, महाविद्यालयातील तसेच विद्यापीठातील सर्व शिक्षकांच्या नियुक्त्या/पदोन्नती/मान्यता या सर्व संबंधीची संपूर्ण प्रक्रिया संगणकाच्या माध्यमातून ऑनलाईन प्रणाली द्वारे सुरू करण्यात आल्या आहेत. महाविद्यालयांच्या तपासणीसाठी जाणाऱ्या विविध समित्या (LIC)/शिक्षक निवडीसाठी निवड समित्या (Selection Committee)/आश्वासित प्रगती योजनेसाठी तज्ञ समित्या (Expert Committee)/तसेच मा. कुलगुरूंचे प्रतिनिधी अशा विविध समित्यांवर नामनिर्देशन करणे इत्यादी सर्व कार्यवाही संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून ऑनलाईन प्रक्रियेद्वारे केली जात आहे. यासाठी विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/संस्था व विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख/प्राचार्य तथा संचालक यांनी आपआपल्या विभागातील/महाविद्यालयातील फक्त **नियमित** शिक्षकांचे (प्राचार्य/प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहायक प्राध्यापक/ग्रंथपाल) अशा मान्यता प्राप्त शिक्षकांची अद्ययावत यादी विद्यापीठाच्या https/muonline.org.in या संकेतस्थळावर तात्काळ भरावयाची आहेत.

सदर यादीमध्ये ६ महिने किंवा ११ महिने कालावधी (तात्पुरते शिक्षक/Adhoc शिक्षक/तासिका तत्वावरील शिक्षक/अभ्यागत (visiting) शिक्षकांची नोंदणी यादीमध्ये करण्यात येवू नये याची कृपया नोंद घ्यावी. तसेच महाविद्यालयाने/विभागाने अशा तात्पुरत्या शिक्षकांची यादी यापूर्वी संकेतस्थळावर भरलेली आहे त्यांनी ती यादी तात्काळ काढून टाकावी.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय, अशासकीय, अनुदानीत व विनाअनुदानीत महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव, मुंबई विद्यापीठातील विविध विभागांचे विभागप्रमुख, सर जे.जे. वास्तुशास्त्र महाविद्यालय, संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था, समन्वयक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अंबाडवे, समन्वयक, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, समन्वयक रत्नागिरी उपकेंद्र, समन्वयक ठाणे उपकेंद्र यांना विनंती करण्यात येते की, विद्यापीठाच्या वरील संकेतस्थळावर तात्काळ माहिती सादर करावी.

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– १७ जानेवारी,२०२०

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

प्रत माहीतीस्तव सादर :—

१. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे — १.
२. मा. सह संचालक, महापालिका मार्ग, मुंबई विभाग, मुंबई — ४०० ००१.
३. मा. सह—संचालक, कोकण विभाग, पनवेल, जिल्हा — रायगड —४१० २०६.
४. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
५. स्वीय सहाय्यक, प्र—कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई —४०० ०३२.
६. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई —४०० ०३२.
७. समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.) विद्यानगरी कॅम्पस, सांताक्रुझ, मुंबई—४०० ०९८.
८. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).